## निशाणी २९ वरील आदेश

(नारायण पायनाईक वि. अरुणा भेरे व. )

**CNR.No.MHSI06-000155-2022**

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करणेत आलेला असून त्यायोगे वादीने प्रतिवादी क्र. १ व ४ हे दावा मिळकतीमध्ये बांधकाम करीत असलेमुळे म्हणणे दाखल करेपर्यंत 'जैसे थै' परिस्थिती ठेवणेबाबत आदेश पारीत होणेकरीता अथवा घर क्र. ५२० चे वाढीव बांधकाम करणार नाहीत असे शपथपत्र दाखल करणेचा आदेश होणेकरीता विनंती केलेली आहे.

**२.** वादीचे मते, प्रस्तुतकामी, प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दावा समन्सची बजावणी झालेली असून प्रतिवादी क्र. १ ही प्रतिवादी क्र. ४ यांच्या मदतीने घराचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करुन घेत आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी सदरचे बांधकाम पूर्ण केलेस वादीला त्याचे हक्कास मुकावे लागणारे असून वादीचे अपरिमित नुकसान होणारे आहे. यापूर्वी, अभिलेखावर हजर करणेत आलेली छायाचित्रे विचारात घेता, बांधकाम वेगाने होत असलचे दिसून येत आहे. या कारणास्तव सदरचा अर्ज मंजूर होणे न्यायोचित आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १ यांचा सायंकाळी ५.२० पर्यंत पुकारा करीता प्रतिवादी क्र. १ व तर्फे वकील न्यायालयात हजर नाहीत. पुरेशी संधी देवून देखील प्रतिवादी क्र. १ यांचे वतीने सदर अर्जावर म्हणणे सादर करणेत आलेले नाही.वादीची तात्काळ दाद मागणी विचारात घेता, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचे म्हणण्याखेरीज निर्णयीत करणेत येत आहे.

**४.** प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र. ४ तर्फे विधिज्ञ यांनी विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांचे मते, वादीने निशाणी क्र. ५ लगत दाखल असणारा अर्ज प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांचेविरुध्द दाखल केलेला असून वादीचे चुकीमुळे अदयाप पर्यंत प्रतिवादी क्र. २ यास दाव्याची समन्स व अर्जाची बजावणी झालेली नाही. वादी हा आपल्या चुकीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ व ४ यांचेविरुध्द 'जैसे थे' परिस्थिती ठेवणेबाबत आदेश पारीत करणेकरीता विनंती करीत आहे.

**५.** वादी व प्रतिवादी क्र. ४ तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुत अर्जान्वये वादीने केलेली विनंती विचारात घेता, प्रतिवादीस ते घर क्र. ५२० चे वाढीव बांधकाम करणार नाही असे शपथपत्र दाखल करणेचा आदेश पारीत करणे न्यायोचित नाही. सबब, सदरची विनंती मान्य करणे मला योग्य वाटत नाही.

७. प्रस्तुत कामी वादी व प्रतिवादी क्र. ४ तर्फे विधिज्ञ यांनी विस्तृत युक्तीवाद केलेला असून, प्रतिवादी क्र. ४ यांनी वादीच्या दाव्यातील कथनांचे वाचन करुन वादीची कथने ही वादी मागत असलेली दाद मंजूर होणेस मारक ठरत आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ हिचा दावा मिळकतीमध्ये कशा स्वरुपाचा हक्क आहे, या अनुषंगे युक्तीवाद केलेला आहे. मूलतः प्रतिवादी क्र. ४ हा कंत्राटदार असल्याचे वादीने दाव्याच्या कथनांमध्ये नमूद केलेले आहे. प्रतिवादी क्र.४ तर्फे करणेत आलेल्या युक्तीवादा दरम्यान प्रतिवादी क्र. ४ याला दावा मिळकतीमध्ये हक्क आहे. अशा स्वरुपाचे कोणतेही कथन करणेत आलेले नाही. यावरुन आजमितीस प्रतिवादी क्र. ४ याचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क संबंध असल्याचे प्रथम–दर्शनी दिसून येत नाही. प्रतिवादी क्र. ४ तर्फे करणेत आलेल्या युक्तीवादा दरम्यान कथन करणेत आलेला प्रतिवादी क्र. १ हिचा हक्क प्रतिवादी क्र. १ हिने न्यायालयासमोर येवून कथन करणे आवश्यक आहे. आजमितीस प्रतिवादी क्र. १ ही व तिचे विधिज्ञ न्यायालयासमोर हजर नाहीत. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र. १ हिचा पवित्रा प्रतिवादी क्र. ४ स्पष्ट करु शकत नाही.

८. आजमितीस प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे दावेस कैफियत व निशाणी क्र. ५ वरील तूर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करणेकरीता निशाणी क्र. २७ व २८ लगत अर्ज दाखल करणेत आलेले आहेत. सदरचे अर्ज मंजूर करणेत आलेले असून प्रतिवादी क्र. १ व ४ यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस मुदत देणेत आलेली आहे. प्रस्तुतकामी वादीने निशाणी क्र.४/१७ व निशाणी क्र. ३०/१ ते ३ लगत हजर केलेली छायाचित्रे विचारात घेता, वादातीत बांधकाम जलद गतीने सुरु असलेचे दिसून येत आहे. वर नमूद केलेप्रमाणे आजमितीस प्रतिवादी क्र.४ याचा दावा मिळकतीशी कोणताही हक्क संबंध दिसून येत नसलेने व प्रतिवादी क्र. १ ही न्यायालयासमोर स्वतःची बाजू मांडणेस उपस्थित नसलेने वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असणारे वाद गुणदोषावर निर्णयीत होईपर्यंत

दावा मिळकतीचे जतन होणे आवश्यक वाटत आहे. अन्यथा, सदर दावा व अर्ज दाखल करणेचा हेतू संपुष्टात येणेची शक्यता नाकारता येत नाही. सबब, न्यायाचे कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** पुढील नेमले तारीखेपर्यंत प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करणेचे नसून दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवणेची आहे.

**२.** वादीने दावा मिळकतीची आजमितीस असणारी परिस्थिती दर्शविणेकरीता दावा मिळकतीच्या सर्व बाजुंनी किमान पाच छायाचित्रे काढून (वेळ व तारीख नमूद असणारे) पुढील नेमले तारीखेस न्यायालयात हजर करणेचे आहेत.

**३.** सदरचा आदेश हा वादी व प्रतिवादी क्र. ४ तर्फे विधिज्ञ यांचे उपस्थितीत पारीत करणेत येत आहे. तथापि, प्रतिवादी क्र. १ व तर्फे वकील यांपैकी कोणीही न्यायालयात उपस्थित नसलेमुळे वादीने प्रतिवादी क्र. १ करीता दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम ३ अन्वये पूर्तता करणेची आहे.

**४.** पुढील नेमली तारीख १७/०३/२०२२.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2022.02.25 11:59:22 +0530

( डी.बी.सुतार )

दिनांकः–२४/०२/२०२२.

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.